# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** राम नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0272 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/07/2025 05:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** प्रहर 6
**Date From (दिनांक पासून):** 30/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/06/2025
**Time From (वेळेपासून):** 16:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/07/2025 **Time (वेळ):** 05:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2025 05:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** एकात्मीक बाल विकास सेवा योजना , प्रकल्प कार्यालय गोंदिया ते ,राहते घर कुडवा गोंदिया, 441601
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अर्चना लक्ष्मीकांत मेश्राम

(b) **Husband's Name** (पती चे नाव) : लक्ष्मीकांत मेश्राम

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काटी क्र 02 मु पो काटी ,काटी क्र 02 गोंदिया, गोंदिया,राम नगर,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काटी क्र 02 मु पो काटी ,काटी क्र 02 गोंदिया, गोंदिया,राम नगर,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9075130465

Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहित असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कु. गुलाब धनलाल पारधी | | वडील का नाम : धनलाल पारधी | 1. एकात्मीक बाल विकास सेवा योजना,प्रकल्प कार्यालय गोंदिया 1 रा,बडा हनुमान मंदीर जवळ कुडवा ,राम नगर,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

पो.स्टे ला तक्रार प्राप्त होताच ताबडतोब

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | POCO कपंनीचा ज.वा.मोबाईल फोन | 17,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 दराची एक भारतीय चलनाची नोट व 100रु दराचे 4भारतीय चलनीय नोटा एकुण | 900.00 |
| 3 | इतर | मानवी अवयव/उत्पादने | 2सॅनलीक्स कपंनीचे मेमोरी कार्ड | 0.00 |
| 4 | इतर | मानवी अवयव/उत्पादने | बेड सिट व उशीचे कव्हर प्रत्येकी 1 नग | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

17,900.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया,दिनांक. 30.06.2025,नांवः- अर्चना लक्ष्मीकांत मेश्राम वय-45 पद-आंगणवाडी सेविका काटी क्र. 02 मु. पो. काटी ता. जि. गोंदिया, मो. क्र. 9075130465.,मी आज दिनांक 30.06.2025 रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देते की, उपरोक्त पत्त्यावर राहत असुन आंगणवाडी केंद्र क्र 02 काटी येथे आंगणवाडी सेविका म्हणुन कार्यरत आहे. माझे नोव्हेंबर/2024 ते मार्च/2025 कालावधीचा 900/-रु प्रवास भत्ता माझे बॅंक खात्यात मे/2025 मध्ये जमा झालेला आहे. आंगणवाडी पर्यवेक्षिका कु. गुलाब पारधी यांनी प्रवास भत्याचे बिल ऑनलाईन एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया गोंदिया 1 याचे कार्यालयात सादर केल्याचा मोबदला व यापुढील कालावधीतील प्रवास भत्ता बिल तयार करुन ते ऑनलाईन एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया गोंदिया 1 यांच्या कार्यालयात पाठविण्यासाठी 900/- रु लाचेची मागणी केल्याने त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई होणेस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे गै.अ. कु. गुलाब पारधी यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

तक्रार

दिनांक 30.06.2025

प्रति,
मा. पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषयः- मला 900/- रु लाच मागणारे अंगणवाडी पर्यवेक्षीका कु. गुलाब पारधी एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया भाग-1 यांचेवर कायदेशिर कार्यवाही करणेबाबत.

अर्जदारः- अर्चना लक्ष्मीकांत मेश्राम वय-45 पद-आंगणवाडी सेविका काटी क्र. 02 मु. पो. काटी ता. जि. गोंदिया, मो. क्र. 9075130465.

महादय,
मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे हजर येवुन तक्रार देते की, वरील पत्यावर आपल्या परिवारासह राहते. दिनांक 14.12.2011 पासुन मी काटी येथील आंगणवाडी केंद्र क्र. 03 येथे मदतनीस म्हणुन कार्यरत होते. दिनांक 28.10.2024 पासुन थेट नियुक्तीवर आंगणवाडी केंद्र क्र. 02 काटी येथे आंगणवाडी सेविका म्हणुन कार्यरत आहे. आंगणवाडी केंद्र क्र. 02 काटी हे काटी बिट अंतर्गत येत असुन, पर्यवेक्षीका म्हणुन कु. गुलाब पारधी नेमणुक काटी बिट, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया 1 हया कार्यरत आहेत. मला आंगणवाडी केंद्र क्र. 02 काटी येथे कर्तव्य बजावत असतांनी वरिष्ठांच्या आदेषाने वेळोवेळी शासनतर्फे आयोजित विविध

प्रशिक्षणाकरीता एकात्मीक बालविकास प्रकल्प कार्यालय गोंदिया व कार्यालयातर्फे आयोजित गोंदिया येथील वेगवेगळ्या ठिकाणी येने-जाने करावे लागते. सदर प्रशिक्षणाकरीता हजर राहील्यास मला शासनाकडुन प्रवासभत्ता मिळतो. नोव्हेंबर/2024 ते मार्च/2025 कालावधीचा 900/- रु प्रवास भत्ता माझे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा काटी येथील खात्यामध्ये मे 2025 मध्ये जमा झाला आहे. 900/- रु प्रवासभत्ता माझ्या बँकच्या खात्यावर जमा झाल्यानंतर आंगणवाडी पर्यवेक्षीका कु. गुलाब पारधी यांनी प्रवासभत्ता बिल काढुन दिल्याचे मोबदल्यात व यापुढे बिल तयार करुन ते एकात्मीक बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात पाठविण्यासाठी 900/- रु ची मागणी केली. पर्यवेक्षीका कु. गुलाब पारधी यांनी मांगणी केलेले 900/- रु हि प्रवास भत्ता काढण्याची कायदेशिर फिस नसुन ती लाच रक्कम असल्याची मला खात्री झाल्याने माझ्याकडे सध्या पैसे नाहीत असे म्हणुन अद्यापपावेतो मी त्यांना पैसे देण्याचे टाळले आहे. परंतु त्या मला वारंवार 900/- रु लाच रक्कमेची मागणी करीत आहेत. दिनांक 27.06.2025 रोजी कु. गुलाब पारधी यांनी त्यांचे मों.क्र. 87888932698 फोनव्दारे माझ्या फोनवर फोन करुन 900/- रु प्रवास भत्ता चे बिल एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया 1 यांच्या कार्यालयात पाठविण्याच्या मोबदल्यात व पुढील कालावधीतल प्रवासभत्ता बिल पाठविण्याकरीता 900/- रु लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्यानंतर दिनांक 28/6/2025 रोजी काटी आंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका या बैठकीस कु. गुलाब पारधी या हजर होती. सदर बैठक संपल्यानंतर कु. गुलाब पारधी हिने माझ्याकडे पुन्हा 900/- रूपयाची मागणी केली. ते मागत असलेले 900/- रु त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने त्यांच्या विरुध्द कायदेशिर कार्यवाही होण्यास विंनती आहे. कु. गुलाब पारधी यांचेसोबत माझे कुठलीही आर्थिक देवाण घेवान अथवा वैमनस्य नाही. हिच माझी तक्रार आहे.

त्यानंतर पो.नि. श्री. राऊत यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच कु. माधुरी दिलीप खोब्रगडे वय 42 वर्ष, पद-कनिष्ठ लिपीक, कार्यालयाचा पत्ता- महिला बालकल्याण विभाग, नगर परिषद कार्यालय गोंदिया व श्री राजेष क्रिष्णाजी हलमारे वय 45वर्ष, पद- कनिष्ठ लिपीक, लेखा परिक्षण विभाग, नगर परिषद कार्यालय गोंदिया यांची आमच्याषी ओळख करुन दिली व त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली. पो.नि. श्री. राऊत यांनी कु. माधुरी दिलीप खोब्रगडे यांना पंच क्र. 1 व श्री राजेश क्रिष्णाजी हलमारे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमले. त्यानंतर पो.नि. श्री. राऊत यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो.नि. श्री. राऊत यांनी स्वाक्षरी केली. पो.नि. श्री. राऊत यांनी प्रथम व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचाना सविस्तर माहीती दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम 500/- रू. दराची 01 व रु.100 दराच्या 4 भारतीय चलनी नोटा असे एकुण 900/- रू. त्यांच्याकडे जमा केल्या. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या अँथ्रासीन पावडरची वैषिष्ट्य सांगुन त्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखवुन त्या चलनी नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका लिफाफ्यात टाकुन सदर लिफाफा ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर मी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गै.अ. कु. गुलाब पारधी, आंगणवाडी पर्यवेक्षीका, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया 1 यांची खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी दिलेल्या सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत मला व पंचास सविस्तर माहीती देवुन 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4241DVCHA0HTसलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कशा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो. याबाबत मला व दोन्ही पंचाना समजावुन सांगीतले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फॉर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्ड फाईल नसल्याची खात्री करुन सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत करुन ठेवले.

त्यानंतर मी पो.नि. राऊत यांना पंचासमक्ष सांगितले की, गैरअर्जदार हे आपले कार्यालयात हजर मिळतील असे सांगितल्याने गैरअर्जदार यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजच गैरअर्जदार यांचे कार्यालयात माझ्या सोबत पंच क्र.1 याना पाठवुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर पो.नि.राऊत यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त महिला कर्मचारी यांनी ट्रॅप सुटेकसमधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD/PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस बाहेर काढले व वेळ 16.05 वाजता सुर करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवित ठेवुन माझे गळयामध्ये ब्लाउजचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह त्यांचे मोपेडने ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथुन गैरअर्जदार हजर असलेले त्यांचे कार्यालय एकात्मीक बाल विकास सेवा प्रकल्प गोंदिया 1, बाई गंबाबाई रुग्णालय जवळ उडडन पुलाचे खाली गोंदिया येथे लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पाठविण्यात आले. पो.नि. राऊत, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि.कार्यालयातच थांबुन होते.

मी गैरअर्जदार गुलाब पारधी यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात परत आले. पो.नि. श्री राऊत यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त महिला कर्मचारी यांनी माझे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.50 वाजता बंद केले.

"मी, पंच क्र. 1 यांचेसह गैरअर्जदार यांचेशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्यास त्यांचे कार्यालय एकात्मीक बालविकास सेवा प्रकल्प गोंदिया-1 येथे गेली असता तिथे गैरअर्जदार गुलाब पारधी हजर मिळाल्या त्यांना नमस्ते पारधी मॅम असे म्हटल्यावर त्याना मी कुछ काम से आयी थी असे सांगीतल्यावर गैरअर्जदार यांनी मला तेरा क्या काम है असे विचारुन त्यांचेजवळ बसुन असलेल्या इसमांबाबत ये बिसेनजी है, ये बोपचेजी है, सर विस्तार अधिकारी है असे सांगुन दे...दो असे म्हणुन प्रवास भत्ता बोले थे ना असे विचारल्यावर मी त्यांना हां असे म्हटले. त्यावर गैरअर्जदार यांनी प्रवास भत्ता नही नवसौ रुपये असे म्हटल्याने मी त्यांना हा असे म्हटले. त्यावर गैरअर्जदार यांनी वही तो बोल रही थी, जनवरी से नही निकला है तेरा, मैने डाल दि हु, निकलेगा तो बतांना मत किसीको तेरा निकाल दि करके, असे म्हटले. त्यावर मी त्यांना वो प्रवास भत्ता नही क्या नवसौ रुपये भेजे आपने असे विचारल्यावर गैरअर्जदार यांनी हं असे म्हटले तेव्हा मी त्यांना नवसौ मे से कुछ कम करो, असे म्हटल्यावर गैरअर्जदार यांनी ओ देखेंगे ना फिर, ओ निकाल रही हु ना, ओ जनवरी के पहीले का है जब तु लगीच नही थी जब का है ओ निकला है ओ तो असे सांगुन तु कब लगी है, असे मला विचारले. त्यावर मी त्यांना अठ्ठाविस दस दो हजार चोविस को लागल्याचे सांगीतले त्यांवर गैरअर्जदार यांनी चोविसको ना दसवे महिनेसे तो उसके पहीले का है, अभी जनवरी से डाली हु पुरा, चिंता मत करं, ओ पोषण ट्रे का भी बना ली और उसका भी डाल रही हु, बैठीच तो हु लिस्ट बनाई असे सांगीतले. त्यावर मी गैरअर्जदार यांना कुछ कम कर लो असे म्हटल्यावर गैरअर्जदार यांनी जाने दोना अभी श्रध्दा को देना है, कुत्ती से मेरा झगडा हो गया असे म्हटले, त्यावर मी, नौसौ के नौसौ थोडी, सौ दो सौ कम ले लो असे म्हटले, त्यावर गैरअर्जदार यांनी देख तेरो को अभी इसमे भी छुट दिई मैने, अभी मैने टीए बिल भरने के मंगी, टिए बिले के नौसौ तो हो गये, मै नुकसान नही करती, लगेगा तो घर आकर मंग लुंगी ऐसी सुपरवायजर हुं असे म्हटल्याने त्यांना लेके आती हु असे म्हणुन पंच क्र. 1 यांचेसह निघुन ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया येथे परत आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन गैरअर्जदार कु. गुलाब पारधी यांनी रु.900/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षवली तसेच प्राप्त करण्याचा देखिल प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यावरुन पोलीस निरीक्षक राऊत यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही आजच त्यांचे कार्यालयात करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन माझेकडे मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केले. पोलीस निरीक्षक राऊत यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येण्याऱ्या दक्षतेबाबत मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सुचना समजावुन सागीतले व मला माझे जवळ असलेली हॅन्ड बॅग रिकामी ठेवण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत यांचे सुचनेवरुन त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी टॅप्प सुटकेसमध्ये लाच रक्कमेचा लिफाफा बाहेर काढुन पंच क्र. 1 यांनी पो.नि. राऊत यांचे सुचनेवरुन सदर लिफाफ्यामधुन अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराची 1 चलनी नोट व 100/- रु. दराचे 4 चलनी नोटा असे एकुण रू. 900/- बाहेर काढुन माझ्या जवळ असलेल्या हॅंड बॅग मध्ये अलगद ठेवुन दिल्या.

माझे मोबाईलवर गैरअर्जदार गुलाब पारधी यांनी त्यांचे मोबाईलवरुन कॉल केले असल्याचे दिसुन आले परंतु मी फोन न उचल्यामुळे ते मिस्ड कॉल झाले होते. पो.नि.राऊत यांनी मला मोबाईलचे स्पिकर सुरु करुन गैरअर्जदार यांचे मोबाईलवर कॉल करण्यास सांगीतले असता गैरअर्जदार यांनी त्या ऑफिस मधुन निघाल्या असुन उडाडन पुलाजवळील नविन लक्की स्टोर्स या कपडयाच्या दुकानाजवळ वसंतनगर गोंदिया जवळ थांबुन असुन तिथे येण्यास सांगीतले. त्यावरुन मला पंच क्र. 1 यांचेसह त्यांचे मोपेडवरुन लाच रक्कम देण्याकरीता नविन लक्की स्टोर्स जवळ गोंदिया येथे पाठविण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर पो.नि. राऊत यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त महिला कर्मचारी यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधुन लाच

मागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेला मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याचे मुळ आवरणामध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडिस्क कंपनीचा, 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र. 4241DVCGT0VDअसलेला एक नविन मेमरी कार्ड टाकला. पो.नि. राऊत यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त महिला कर्मचारी यांनी वेळ 17.18 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 व माझे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत केले व ते व्हॉईस रेकॉर्डर एका कापडी पिषवित ठेवुन ती पिशवी दोरीचे सहाय्याने माझे गळ्यामध्ये ब्लाउजचे आत लटकवुन दिली.
त्यानंतर आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक राऊत हे पंच क्रमांक 2 व सापळा पथकासह शासकीय व खाजगी चारचाकी वाहनाने लक्की स्टोर्स जवळ गोंदिया येथे पोहचुन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत दबा धरुन बसुन माझे नियोजीत ईशाऱ्याची वाट पाहत बसले. त्या ठिकाणी गैरअर्जदार दिसुन येत नसल्याचे कायमी अप.क्र. क्रमांक 272 /2025 कलम 7भ्रष्टाचार अधिनियम 1988(सुधारित अधिनियम 2018) पो.नि. राऊत यांना कळविले, त्यावरुन पो.नि. राऊत यांनी मला ईशाऱ्याने गैरअर्जदार यांना फोन करण्यास सांगीतले. त्यावरुन गैरअर्जदार यांना फोन केला असता गैरअर्जदार यांनी मला जुना लक्की स्टोर्स जवळ, गोरेलाल चैका जवळ गोंदिया येथे येण्यास सांगीतल्याने मी पंच क्र. 1 यांचे सह जुना लक्की स्टोर्स येथे जाण्यास रवाना झाले. आमचे पाठोपाठ पो.नि. राऊत, पंच क्र. 2 व सापळा पथक हे देखिल गोरेलाल चैकाचेजवळ पोहचुन आप-आपले वाहन थांबवुन कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहन उभे करुन माझ्या नियोजीत ईशाऱ्याची वाट पाहत थांबले होते परंतु त्या ठिकाणी सुध्दा गैरअर्जदार दिसुन आले नाहीत. त्याबाबत पो.नि. राऊत यांना ईशाऱ्याने कळविले, त्यावरुन पो. नि. राऊत यांनी मला ईशाऱ्याने गैरअर्जदार यांना फोन करण्यास सांगीतले. त्यावरुन मी गैरअर्जदार यांना फोन केला असता गैरअर्जदार यांनी मला आपले घरी कुडवा येथे बोलाविले. त्यावरुन मी पंच क्र. 1 यांचेसह गैरअर्जदार यांचे रहाते घरी बडा हनुमान मंदीरा जवळ कुडवा येथे पंच क्र. 1 यांचेसह जाण्यास रवाना झाले. आमचे पाठोपाठ पो.नि. राऊत, पंच क्र. 2 व सापळा पथक हे त्या ठिकाणी पोहचुन आप-आपले वाहन थांबवुन कोणालाही संषय येणार नाही अशाप्रकारे वाहन उभे करुन माझ्या नियोजीत ईशाऱ्याची वाट पाहत थांबले.
त्यानंतर मी गैरअर्जदार यांचे मोबाईलवर कॉल केले असता त्यांनी त्यांचे घराचा पत्ता सांगुन सिधे सिधे आवं मै खडी हु रोड पें असे सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही त्यांचे घराकडे जात असतांना गैरअर्जदार हया आपले घरा समोर रोडवर उभ्या दिसल्या त्यांनी मला पाहुन ढुंढते ढुंढते आयी तो चल अच्छा हुआ असे म्हटले त्यानंतर घरी आत गेल्यावर गैरअर्जदार यांनी माझ्या सोबत इकडतिकडच्या गोष्टी केल्यानंतर तुम्हारे साथ ये कोण है असे विचारले असता मी गैरअर्जदार यांना यह आपके बेहेन बेटी असल्याचे सांगीतले, त्यानंतर मी आपले हॅन्ड बॅगमधुन लाच रक्कम काढुन गैरअर्जदार यांना यह आपके नौसौ रुपये, जो बोले थे नौसौ भत्ते के असे म्हणुन पुरे गिन लो असे म्हटल्यावर गैरअर्जदार यांनी हव असे म्हणुन हाताचे ईशाऱ्याने बेडवरच्या उषी खाली ठेवण्यास सांगीतल्याने मी त्यांचे सांगण्याप्रमाणे लाच रक्कम बेडवरच्या उषी खाली ठेवले. त्यानंतर पुन्हा आमच्यात इकडतिकडच्या गोष्टी होवुन गैरअर्जदार यांनी पंच क्र. 1 यांचेबद्दल विचारुन ये दिदी का क्या सर नेम है असे विचारल्यावर पंच क्र. 1 यांनी बैस हे सरनेम सांगीतले. त्यावर त्यांनी प्रॉपर यहाच रहते क्या दिदी असे विचारल्यावर मी त्यांना हो म्हटले. त्यानंतर मी पंचासह गैरअर्जदार यांचे घराचे बाहेर समोर रोडवर येवुन गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केल्यावर पो.नि. राऊत हे पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली". याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरीक्षक राऊत यांनी पंचनामा मध्ये घेतल्या आहेत.
तरी आरोपी लोकसेवीका कु. गुलाब धनलाल पारधी वय-52 वर्ष पद-आंगणवाडी पर्यवेक्षीका, (वर्ग-3) काटी बिट, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय गोंदिया 1 रा. बडा हनुमान मंदीर जवळ कुडवा गोदिया ता. जि. गोंदिया यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन माझे नोव्हेंबर/2024 ते मार्च/2025 कालावधीचे प्रवास भत्ता देयक 900/- रु आंगणवाडी पर्यवेक्षीका कु. गुलाब पारधी यांनी काढुन दिल्याचे मोबदल्यात व यापुढे बिल तयार करुन ते एकात्मीक बाल विकास सेवा प्रकल्प योजना गोंदिया 1 यांच्या कार्यालयात सादर केल्याचा मोबदला तसेच या पुढील काळातील प्रवास भत्ता देयक ऑनलाईन एकात्मीक बाल विकास सेवा प्रकल्प योजना गोंदिया 1 यांचे कार्यालयात पाठविण्यासाठी 900/- रु लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन गैर फायदा घेतला आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन मला पंचासमक्ष वाचुन दाखविले माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

( अर्चना लक्ष्मीकांत मेश्राम )
रा. मु. पो. काटी ता. जि. गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PRAVIN DEVAJI BORKUTE(I (Inspector)) / 15101000402PDBM810M

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused Investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of Jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओं .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** PRAVIN DEVAJI BOR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402PDBM810

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**